MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

**सुट्टीची सुचना**

उद्या विजयादशमीनिमित्त सायं.दै.महाराष्ट्र आरंभ कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे उद्या दि.१२ ऑक्टोबरचा अंक प्रकाशित होणार नाही. कृपया वाचक, हितचिंतक, जाहिरातदार यांनी याची नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक
सा.दै.महाराष्ट्र आरंभ



माजलगाव । सुनिल थोरात

समाज सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व विविध मागण्यासाठी माजलगाव मध्ये मातंग अधिकार मोर्चा धडकला. हक्क हे मागून मिळत नसतात त्यासाठी संघर्ष करावा लागतो या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकराच्या शिकवणीचा पाया अंगीकृत करून समाजाच्या विविध मागण्यांसाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मागण्या अशा होत्या की साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे, अ ब क ड आरक्षण वर्गीकरण लवकरात लवकर लागू करावे, माजलगाव शहरात अण्णाभाऊ साठे सास्कृतिक सभागृह उभे करावे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ सुरू करून महामंडळाची पारदर्शक कारभाराची राज्य सरकारने हमी द्यावी,

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२४ | शुक्रवार दि.११ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -24 | FRIDAY DT.11 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# लोकांचा पैसा 'चना' फुटाण्यासारखा खावुन अर्चना मॅडम 'कुठे' लपुन बसल्या?




- अर्चना कुटेसाठी पडद्यामागे राहून अटक न करण्यासाठी सर्व तडजोड कोण करत आहे त्यालाही सह आरोपी करा.?
- ज्ञानराधाची एक हजार सत्यानव कोटीची मालमत्ता ईडी करून जप्त मात्र अर्चना कुठे अजूनही फरारच?
- डीवायएसपी विश्वंभर गोल्डे हे ज्ञानराधाच्या सुरेश कुटे, अर्चना कुटे, यशवंत कुलकर्णी च्या प्रकरणात तडजोडी मध्ये तपास करत आहेत. अशी चर्चा बीड शहरात जोर धरू लागली आहे?
- ज्ञानराधाच्या अर्चना कुटेला अटक करण्यासाठी पोलिसांना आता कोणता मुहुर्त पाहिजे?
- दसऱ्याच्या मुहूर्तावर तर अर्चना कुटे सापडत नाही मग आणखीन मुहूर्त कोणता आहे ते पोलिसांनी स्पष्ट करावा?
- पोलिसांना अर्चना कुटे कुठं आहे माहित आहे पण आर्थिक तडतडीमध्ये अर्चना कुटे नि अटक न करण्याचा मोठा राजकीय आश्रय असल्याची चर्चा?
- अर्चना कुटे नि सर्वसामान्यांचा पैसा कुठे कुठे नेऊन ठेवला हे अर्चना कुटे च्या अटकेतून समोर येईल?

ज्ञानराधा'ला ईडीचा दणका; १ हजार कोटींची मालमत्ता जप्त; मुंबई, बीड, जालना येथील संपत्ती.

# सणासुदीच्या काळात ठेवींदारांचा 'शिमगा'

## ज्ञानराधात लोकांचे पैसेच नाहीत तर ठेवीदारांचे स्वप्नही बुडाले

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीमध्ये झालेल्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी ईडीने बुधवारी सोसायटीची १००२ कोटी ७९ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये मुंबई, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना येथील काही इमारती आणि भूखंडांचा समावेश आहे.

यापूर्वी सप्टेंबर महिन्यात ईडीने सोसायटीची ८५ कोटी ८८ लाख रुपयांची अचल मालमत्ता जप्त केली होती. त्यावेळी जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि बीड येथील काही फ्लॅट, कार्यालयांची जागा आणि भूखंड, आदींचा समावेश होता. आतापर्यंत सोसायटीची एकूण १०९७ कोटी ८७ लाख रुपयांची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे.

काही गुंतवणूकदारांना सुरुवातीला त्यांनी परतावा दिला. मात्र, त्यानंतर तो दिला नाही तर अनेक गुंतवणूकदारांना एक रुपयादेखील परत मिळालेला नाही. कुटे यांनी २३१८ कोटी रुपयांचा अपहार करत ते पैसे आपल्या अन्य कंपन्यांत कर्ज रूपाने वळवल्याचा ठपकाही ईडीने त्यांच्यावर ठेवला.

किमान चार लाख गुंतवणूकदारांना गंडा* ज्ञानराधा सोसायटीने १२ ते १४ टक्के व्याजदराने परतावा देणाऱ्या अनेक ठेव योजना सादर केल्या होत्या. तसेच, सोसायटीने सोने, वैयक्तिक कर्ज, गृह कर्ज, मुदत ठेवींवर कर्ज अशा कर्ज योजनादेखील सादर केल्या होत्या. सुरेश कुटे आणि यशवंत कुलकर्णी या दोघांच्या नियंत्रणाखाली सोसायटीचे काम होत होते. त्यांनी राज्यभरातील किमान चार लाख गुंतवणूकदारांना गंडा घातल्याचे तपासादरम्यान निदर्शनास आले आहे.

ज्ञानराधा बँक कोट्यावधी रुपयाचा निधी लोकांच्या मेहनतीचा पैसा हडप केल्यानंतर तो पैसा कुठं खर्च केला यासाठी अर्चना कुटेला अटक करणे गरजेचे आहे. अर्चना कुटेला अटक न करण्यासाठी व ज्ञानराधाचा सर्वेस्वार असलेला सुरेश कुटेला अटक केल्यानंतर सर्व तडजोडी लावण्यामध्ये पडद्यामागे जो कोणी असेल त्यालाही ज्ञानराधाच्या गुन्ह्यांमध्ये सह आरोपी करा अशी मागणी आता जनतेकडून होत आहे. यामध्ये बीड जिल्हा पोलिसांकडून अर्चना कुटे ला अटक न करण्यासाठी सवलत दिली आहे का असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत आहे. तर आजच्या कुटे यांना अटक न करण्यासाठी एक व्यक्ती त्या ठिकाणी पडद्यामागे राहून काम करत आहे त्यामुळे तो व्यक्ती कोण आहे शोधून त्यालाही आरोपी करणे गरजेचे आहे परंतु बीड जिल्हा पोलिसांकडून अर्चना कुटे ला आता अटक न करण्यासाठी आर्थिक तडजोड मोठ्या आकड्यात झाल्याची चर्चा पोलीस प्रशासनात दबक्या आवाजात चालू आहे.? तसेच यशवंत कुलकर्णी च्या मालमत्तेवर सुद्धा ईडीने कारवाई करणे गरजेचे आहे. बीड जिल्हा पोलीस दलातील डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी यामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे. परंतु गोल्डे हे तडजोडी मध्ये जास्त व्यस्त असल्याचे चित्र या तपासामध्ये स्पष्ट दिसून येत आहे.

# गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत अपघातासाठी सानुग्रह अनुदान योजनेचे कवच लागू

## धनंजय मुंडेंची स्वप्नपूर्ती, शासन निर्णय निर्गमित कामगार अपघातात मृत झाल्यास ५ लाखांचे कवच, उपचारांसाठी देखील मिळणार निधी, पशूंनाही सानुग्रह अनुदानाचे कवच

मुंबई - सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना धनंजय मुंडे यांनी लावलेल्या रोपट्याला आता फळे येताना दिसत असून नुकत्याच राज्य शासनाने ऊसतोड कामगारांसाठी घोषित केलेल्या अपघात विमा कवचाला सानुग्रह अनुदान योजनेचे मूर्त स्वरूपात प्राप्त झाले असून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून या सानुग्रह अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून ऊस तोडणीच्या हंगामात कोणत्याही प्रकारच्या अपघातामध्ये ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याला पाच लाखांचे कवच या योजनेतून देण्यात येणार आहे, तर कायमचे अपंगत्व आल्यास अडीच लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

ऊसतोड कामगारांच्या झोपडी व साहित्याला १० हजारांचे, वैयक्तिक अपघातात उपचारासाठी ५० हजार रुपयांचे, लहान बैलजोडी मृत झाल्यास ७५ हजार रुपयांचे तर मोठी बैलजोडी मृत झाल्यास १ लाख रुपयांचे कवच या सानुग्रह अनुदान योजनेतून लागू करण्यात आले आहे. अत्यंत कमीत कमी कागदपत्रे तसेच जिल्हा स्तरावर मंजुरीचे अधिकार दिल्याने खऱ्या अर्थाने ऊसतोड कामगारांना या योजनेचा अधिक लाभ मिळणार आहे.

आजवर ऊसतोड कामगारांची कुठे कागदावर नोंद सुद्धा नसायची, मात्र सध्याचे कृषिमंत्री व तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला मूर्त स्वरूप मिळाले. त्याला कायमस्वरूपी निधी मिळण्याचा मार्ग सुकर झाला. महामंडळाच्या माध्यमातुन धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवानबाबा शासकीय वस्तीगृह योजनेतून तब्बल ८२ वसतिगृहे सुरू करण्यात आली. ऊसतोड कामगारांची नोंदणी झाली. त्यापाठोपाठ आता अत्यंत जोखमीचे काम करणाऱ्या ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम तसेच कामगारांची बैलजोडी ते अगदी झोपडी व त्यातील साहित्याला अपघात व नैसर्गिक आपत्ती अपघाता मुळे होणाऱ्या नुकसानीसाठी सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याने, धनंजय मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी पाहिलेले आणखी स्वप्न पूर्ण झाले आहे, असे म्हणता येईल.

राज्यातील ऊसतोड कामगार, वाहतूकदार, मुकादम, बैलजोडी, झोपडी आदींना सानुग्रह अनुदान योजना लागू केल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# पठाण मुकद्दस लतीफखान यास सुवर्णपदक



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि बलभिम महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीडच्या विधी महाविद्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा खेळाडू पठाण मुकद्दस लतीफखान याने गोळाफेक क्रीडा प्रकारात ११.८० मीटर गोळाफेक करीत प्रथम पटकावित सुवर्णपदक प्राप्त केले तसेच थाळीफेक मध्ये तृत्तीय क्रमांक प्राप्त करीत कास्य पदक प्राप्त करीत अंबड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली या खेळाडुला क्रीडा विभाग प्रमुख डॉ. प्रविण भोसले यांनी मार्गदर्शन केले. पठाण याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर . थारकर उपप्राचार्थ डॉ. रमेश सोनटक्के पदण्युत्तर संचालिका डॉ.शैलेजा बरुरे, ज्ञानेश्वर वडजे यांनी अभिनंदन केले.

# ग्रामस्थांना साथीच्या आजारावर मोफत आरोग्य शिबिरातून दिलासा



**बीड (प्रतिनिधी)**

**लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे संकल्पनेतून काकू नाना प्रतिष्ठान,आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षिरसागर वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत मा.उपमुख्यमंत्री (गृह /विधी व न्याय)मंत्रालय मुंबई. यांच्या समन्वयातून दिनांक१०ऑक्टोबर २०२४ रोजी बीड तालुक्यातील नागझरी येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

हवामानाच्या बदलामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्या विषयी समस्या उद्भवत असून प्रामुख्याने सर्दी,ताप,खोकला,हाडांचे आजार,मणक्याचे आजार,संधिवात,तसेच संसर्गजन्य रोग याबाबत तक्रारी निदर्शनास आल्या. या सामुदायिक आरोग्य कॅम्पच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे मोफत तपासणी करून ई.सी.जी.रक्त, तपासण्या करून औषधोपचार केला जातो. या समाज उपयोगी शिबिरा मुळे ग्रामस्थांस मोठा दिलासा मिळत असल्याचे दिसून येत आहे.काकू नाना प्रतिष्ठानचे डॉ.अरुण भस्मे,प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उप प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार,समन्वयक डॉ.अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान,डॉ.श्रेयस ढाकणे,डॉ.विश्वजीत बोंडार,डॉ. आनंद दाभाडे,डॉ.योगेश धुमक यांच्या परिश्रमाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर यशस्वी झाले.

## नवसाला पावणारी चिंचवनची जगदंबा

# बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून येतात दर्शनासाठी भाविक

वडवणी (प्रतिनिधी)

ऐतिहासिक भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वडवणी तालुक्यातील चिंचवण येथील जगदंबा देवी नवसाला पावणारी देवी म्हणून विख्यात आहे नवरात्र महोत्सवात या देवीची भव्य यात्रा भरते संपूर्ण बीड जिल्ह्यातील भावीक या ठिकाणी आपापले नवस फेडण्यासाठी या ठिकाणी येतात .भव्य दिव्य स्वरूपात यात्रा भरते या कार्यक्रमाची सांगता पुणवेला कुस्त्याच्या दंगलीने होत असते.

चिंचवन गावाला खूप मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. रामायणातील कथेत अहिरावण, महीरावण राक्षसाने राम लक्ष्मणाला ज्या गुहेत लपवून ठेवले होते आणि त्याच गुहेतून द्वारपाल मकरध्वजासोबत हनुमंताचे कठोर युद्ध झाले होते. त्यानंतर हनुमान आणि मकरध्वजाचा परिचय झाला. ती रामायण काळातील मंकावती म्हणजे आजचे वडवणी तालुक्यातील चिंचवन हे गाव होय. या गावात आजही ते भुयार पाहायला मिळत आहे. मंकावती देवीचे या ठिकाणी मंदिर आजही आहे . मकरध्वजाचे एकमेव मंदिर चिंचवण येथे आहे. या ठिकाणी अनेक हेमाडपंती मंदिरे पाहायला मिळतात. त्यातील एक मंदिर म्हणजे जगदंबा देवीचे मंदिर. हे मंदिर रामायण काळातीलच स्थापित झालेले मंदिर असावे असे भाविकांचे मत आहे. या ठिकाणी जगदंबा देवीचे कोरीव दगडाच्या इमारतीमध्ये मूर्ती पाहायला मिळते. या मंदिरामध्ये खूप वर्षांपूर्वीपासून नवरात्र महोत्सव मोठ्या थाटात पार पडतो. चिंचवन आणि वडवणी तालुकाच नाही तर जिल्ह्यातील कानाकोपऱ्यातील भाविक या ठिकाणी दर्शनासाठी येतात. आपले नवस देवीला सांगतात आणि देवीही भक्तांच्या नवसाला पावते अशी धारणा आहे..म्हणून भक्तांची या देवीवर खूप मोठी श्रद्धा आहे. .दरवर्षी नवरात्र महोत्सव मोठ्या थाटामाटात पार पडतो. चिंचवन आणि परिसरातील भाविक दर दिवशी या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात. देवीची घटस्थापना होण्याच्या अगोदर चिंचवन गावातील अनेक तरुण तुळजापूरला जाऊन ज्योत घेऊन पायी येतात. या देवीला तुळजापूरच्या भवानीचे दुसरे ठाणं म्हणून ओळखलं जातं. भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारी ही देवी या भागातील भाविकांच्या मनामनात घर करून बसलेली आहे .या भागातील भाविक आपापली कामे सोडून देवीच्या प्रत्येक कार्यक्रमाला हजेरी लावतात दसरा झाल्यानंतर पुनवेला या



ठिकाणी भव्य यात्रा भरते यात्रेला बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सर्व भाविक या ठिकाणी येतात. चिंचवन आणि परिसरातील जेवढ्या मुली परभागात दिलेल्या आहेत त्या सर्व लेकी आपापले नवस फेडण्यासाठी चिंचवनला माहेरी येतात. या ठिकाणी भव्य कुस्त्यांची दंगल देखील आयोजित केली जाते. कुस्त्या खेळणाऱ्या पहिलवानांचा बक्षीस देऊन गौरव केला जातो .अशा देवीच्या यात्रेसाठी यावर्षी देखील भव्य रोषणाई करण्यात आली आहे. मंदिराची रंगरंगोटी करून परिसर स्वच्छ करण्यात आला आहे. .या देवीची यात्रा भव्य आणि दिव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी चिंचवन येथील सर्व तरुण मंडळ सर्व भाविक भक्तगण माता भगिनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करीत आहेत. या देवीच्या यात्रेसाठी बीड जिल्ह्यातील सर्व भाविकांना उपस्थित राहावे असे आवाहन गावकऱ्यांनी केले आहे.

### सर्वधर्मसमभाव ...

चिंचवन गावात आठरा पगड जातीचे लोक गुण्यागोविंदाने राहतात राजकीय मतभेद जरी असले तरी या ठिकाणी देवीच्या यात्रेमध्ये सर्व लोक एकत्र येतात या गावात मुस्लिम, बौद्ध समाजाची संख्या देखील मोठ्या प्रमाणात आहे. मुस्लिम, बौद्ध समाजाचे बांधव देखील देवीच्या यात्रेमध्ये सहभागी होऊन सर्वधर्मसमभाव पाळतात.

### पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष

येथील हेमाडपंथी कोरीव दगड काम असलेले अनेक मंदिरे आहेत या गावाला रामायणाचा इतिहास आहे एवढे असूनही या गावाकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष आहे. पुरातत्व विभागाने या गावातील सर्व मंदिराची पाहणी करून त्या मंदिराचे जतन करणे आवश्यक आहे मात्र पुरातत्व विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी या मंदिराकडे लक्ष दिलेले दिसत नाही.

# संताच्या विचाराने प्रेरित होऊन शिवाजीराव दादांनी सामान्य माणसांना मोठे करण्याचे काम केले आहे- शिवाजी महाराज

## साधु संत महंताच्या उपस्थित संपन्न झाला शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : अनेक वर्षाचे पुण्य शिवछत्र परिवाराच्या पदरी असल्याने गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते शिवाजीराव दादा पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह होत आहे, हा मोठा आनंद असून शिवाजीराव दादांनी जीवनात सत्याची तपश्चर्या केली आणि सत्य वचनाने वागले. संताच्या विचाराने प्रेरित होऊन दादांनी सामान्य माणसांना मोठे करण्याचे काम केले आहे . जे दुसऱ्यांना मोठे करतात ते मोठेच असतात असे प्रतिपादन श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत ह.भ.प. शिवाजी महाराज यांनी केले. शिवाजीराव दादा पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या कार्यक्रमात कीर्तन सेवा करताना ते बोलत होते. माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा साधु, संत महंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रारंभी उपस्थित महंतांच्या हस्ते शिवाजीराव पंडित यांचा सत्कार करण्यात आला तर श्रीक्षेत्र नारायण गडाच्या वतीने ह. भ. प. शिवाजी महाराज यांनी शिवाजीराव (दादा) पंडित यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. श्रीक्षेत्र नारायण गडाचे महंत



शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत महादेव महाराज, श्रीक्षेत्र बंकटस्वामी संस्थानचे महंत ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज, श्रीक्षेत्र रामगडाचे महंत ह.भ.प. योगीराज महाराज, संत नामदेव संस्थांन बोरीपिंपळगावचे नामदेव महाराज, श्रीक्षेत्र चितेश्वर संस्थानचे दिलीप महाराज घोगे, पंचमुकेश्वर संस्थानचे महादेव महाराज श्रावणपुरी यांच्यासह ह.भ.प.दत्ता महाराज, ह. भ. प. नाना महाराज कदम, ह. भ. प. बागलाने महाराज, उत्तम नाना मोटे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आदरणीय दादांचा सेवाभाव आम्ही पुढे घेऊन जात आहोत - विजयसिंह पंडितआपल्या भाषणात विजयसिंह पंडित म्हणाले की, आदरणीय दादांनी आपल्या भागाचा विकास व्हावा हा विचार सार्थ केला आहे. सामाजिक व राजकीय जबाबदारी आणि संस्कार आम्हाला दिले आहेत, तो वारसा आम्ही सक्षमपणे पुढे घेऊन चालत आहोत. दादांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने हा अखंड हरिनाम सप्ताह घेऊन संताचा विचार सामान्यांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न कार्यकर्त्यांनी केलेला आहे. येणाऱ्या काळात सुद्धा ही धार्मिक चळवळ अशीच पुढे चालू ठेवू असेही त यावेळी म्हणाले,

जीवात जीव असे पर्यंत आम्ही आहोत तोपर्यंत दादांचा अभिष्टचिंतनसोहळा साजरा करणार - भाऊसाहेब नाटकरकार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अभिष्टचिंतन सोहळा समितीचे प्रमुख भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, दादांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आम्ही सर्व कार्यकर्ते मिळून सप्ताह करत आहोत. यापुढेही आम्ही आहोत तोपर्यंत दादांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाईल असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, युवानेते विजयदादा खरात, पृथ्वीराज पंडित यांच्यासह सर्व साधु संत, महंत, विविध संस्थांचे पदाधिकारी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले.




# सिरसदेवीत मातोश्री सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न-शाम अडागळे

सिरसदेवी (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे आज दि. १०/१०/२०२४ रोजी मातोश्री सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने नवरात्र महोत्सव निमित्त मोफत नेत्र तपासणीचे आयोजन करण्यात आले.मानवी जीवनामध्ये डोळे हे सर्वात सुंदर व महत्त्वाचा अवयव असतों डोळ्यांमुळे शरीराचे सौंदर्य खुलते डोळे आपल्याला हे जग दाखवितात जगातील सुंदर गोष्टींचा अनुभव डोळे अपाल्याला देतात डोळे हे भावना व्यक्त करण्याचे साधन आहे तसेच दुसऱ्याच्या भावना समजून घेता येतात परंतु जेव्हा मानव वयस्कर होऊ लागतो यावेळी या डोळ्यांची नजर कमी कमी होत जाते अनेक आजार डोळ्यांना होतात यामुळे दिसण्यात अडथळे निर्माण होतात ग्रामीण भागामध्ये या डोळ्यांच्या आजारावर उपचार उपलब्ध होत नाहीत कधी आर्थिक कारणामुळे तर कधी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अशा लोकांसाठी आज सिरसदेवी येथे शारदीय नवरात्रौत्सव निमीत्ताने श्री मातोश्री सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर ठेवण्यात आले होते अनेक नागरिकांनी मोफत तपासणीचा लाभ घेतला यावेळी डोळ्यांच्या विविध आजारांचे निदान करण्यात आलें यामुळे अनेकांच्या आयुष्यात प्रकाश येणारं आहे.

मातोश्री सामाजिक प्रतिष्ठान ने घेतल्या मुळे अनेक नागरिकांनी प्रतिष्ठान चे आभार व्यक्त केले तसेच या शिबिराचे उद्घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष हरिभाऊ मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे सचिव मुकेश नांदे, उपाध्यक्ष सतीश पटाईत, कोषाध्यक्ष श्रीमंत सानप,सरपंच रवींद्र गाडे,कदम सर, भरत कदम, भागवत कांबळे, श्रिकीसन शिंदे,जगदीश वेताळ,बाळासाहेब रोमन, श्रीकिसन वेताळ, ड.उमेश वेताळ, गावातील नागरिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# परळी तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत असलेली सिरसाळा या गावची ६९ लाभार्थ्यांची फाईलच गायब झालेली आहे

दिनांक ११ सिरसाळा! प्रतिनिधी शिरसाळा या गावचे ६९ पाहिली तयार करण्यात आल्या होत्या व त्या फाइल्स कलेक्टर ऑफिस बीड येथे जमा केलेल्या असताना तात्पर बीड जिल्ह्याच्या यादीमध्ये शिरसाळा ग्रामपंचायतचे व लाभार्थ्यांचे नाव कोठेही आढळून आलेलं नाही तरी ६९ पाहिली बीड येथे जमा केलेले असताना त्या पाहिलीची मुंबई व यशवंत चव्हाण मुक्ति वसाहत या योजनेमध्ये शिरसाळा गावच्या फाइल्स समाविष्ट झाल्या नाहीत नामदार पालकमंत्री धनंजय मुंडे यांना मानणारा वर्ग हा शिरसाळा विभाग आहे पण याच शिरसाळ्याची इत्यादी लाभार्थीच त्या यादीमध्ये नाव दिसून आलं नाही याकरिता येथील नागरिक संताप व्यक्त करीत आहेत बीड जिल्ह्यामध्ये २८ हजार घरांची मंजुरी झाली जिल्ह्याला सर्वात मोठा फायदा झाला आहे व हे असे पहिल्यांदाच महाराष्ट्राचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी करून दाखवला आ.हे एवढा मोठा घरकुलांचा साठा बीड जिल्ह्यासाठी उपलब्ध करून यशवंत चव्हाण मुक्त वसाहत घरकुल



योजनेचा मोठा दिलासा मिळाला आहे पण त्यांच्याच मतदारसंघातील बीड जिल्ह्यात व परळी तालुक्यात सर्वात मोठी ग्रामपंचायत मानली जाणारी शिरसाळा ग्रामपंचायत या ग्रामपंचायतीच्या नावाने एकही लाभार्थ्यांचे नाव आढळून आले नाही याची दखल घेऊन ज्या ६९ फाईल बीड कलेक्टर ऑफिस येथे जमा केलेले आहेत त्याचा तात्काळ मंजूर करून त्या यादीत आचारसंहिता लागायच्या अगोदर समाविष्ट करावी ही नागरिकांची कळकळीची विनंती करण्यात येत आहे .



**बीड (प्रतिनिधी)**

**सायं. दैनिक बीड रिपोर्टर चे संपादक तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे भावी उमेदवार शेख तय्यब यांची आज दिनांक १० ऑक्टोबर २०२४ गुरुवार रोजी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या अशासकीय सदस्य पदी निवड झाली आहे. या निमित्ताने शेख अजहरुद्दीन, खतीब सय्यद मिनहाजुल आबेदिन, बीड जिल्हा परिषदेच्या योजना विभागातील सहाय्यक योजना अधिकारी खतीब सय्यद मिसबाहूल आबेदीन, सय्यद अदनान, मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ, सय्यद आदिल आणि शेख लईख यांनी पुष्पगुच्छ देत पेढे भरवून हृदयी शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या हातून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक कर्ज मिळवून देण्याचे कार्य जास्तीत जास्त प्रमाणात आणि लवकरात लवकर व्हावे अशा सदिच्छा व्यक्त केल्या.**

